# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर, एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली - ४४२६०५

दुरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७१३२-२२३३२०
ईमल : coegondwana@gmail.com


जा. क्र. गों.वि/परीक्षावि./३१९२/२०२० दि. १०/०९/२०२०

## परीपत्रक

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत मार्गदर्शक सुचना**

**संदर्भ :-** १. मा. विद्यापरीषदेची झालेली सभा दि. ०५.०९.२०२०
२. प्रात्यक्षिक परीक्षा समितीची झालेली सभा दि. ०९.०९.२०२०

गोंडवाना विद्यापीठातील सलंग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भीय सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार गोंडवाना विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०१९-२० मधील उन्हाळी २०२० परीक्षेतील पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षा दि. १५.१०.२०२० पासुन दि. ०५.०९.२०२० पर्यत online पध्दतीनूसार घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने ऑनलॉईन प्रात्यक्षिक परीक्षेबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात येत आहे.

**<u>शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता पदवी/पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षाच्या /अंतिम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत मार्गदर्शक सुचना.</u>**

१. विद्यार्थ्याच्या पदवी/पदव्युत्तर प्रात्यक्षिक परीक्षा घरुनच घेतल्या जातील.
२. विद्यार्थ्याच्या पदवी/पदव्युत्तर प्रात्यक्षिक परीक्षा Online पध्दतीने घेतल्या जातील.
३. विद्यार्थ्याच्या पदवी/पदव्युत्तर प्रात्यक्षिक परीक्षा Google form/email/Whatsapp किंवा समकक्ष Softwore वापरुन Question-Answer द्वारा घेण्यात येईल.
४. Covid - १९ मुळे पदवि/पदव्युत्तर च्या प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी (Laboratory Practical exam) बाहय परीक्षक (External Examiner) राहणार नाहीत.
५. Covid - १९ मुळे पदवि/पदव्युत्तर प्रात्यक्षिकाचे मुल्यमापन अंतर्गत परीक्षका द्वारे करण्यात येईल.
अ) प्रात्यक्षिक परीक्षा यशस्वीरित्या पार पाडण्याची जबाबदारी प्राचार्य यांचेवर राहील.
६. अंतर्गत परीक्षकांची (Internal Examiners) यादी या अगोदर विद्यापीठाने दिलेली नसल्यास प्राचार्यांनी आपले स्तरावर नियुक्ती करुन प्रात्यक्षिक परीक्षा पार पाडाव्यात.
७. अंतर्गत परीक्षक हा विद्यापीठातील मान्यता प्राप्त अधिव्याख्याता असावा व तो शक्यतोवर महाविद्यालयीन/स्थानिक असावा. मात्र असा अधिव्याख्याता स्थानिक स्तरावर उपलब्ध नसल्यस विद्यापीठ मान्यता प्राप्त CHB शिक्षकाची (२०१९-२० सत्र) नेमणूक करण्यात यावी.
८. प्रात्यक्षिक परीक्षेचे मुल्यमापना संबंधीत विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या योजने (Scheme) नुसार घेण्यात यावे. (Prepared by subject Board of Studies)
९. पदव्युत्तर प्रकल्प मुल्यमापनासाठी (Project Evaluation) अंतर्गत व बाहय परीक्षक विद्यार्थ्यांचे मुल्यामापन करतील. बाहय परीक्षकाची नियुक्त प्राचार्य करतील. प्रकल्पाच्या (Project) मुल्यामापनासाठी PPT सादरीकरण (Presentation) आवश्यक राहील. सादरीकरणासाठी Zoom/Webex/Google meet/Online Platform वापरावे. त्याचे Recording जतन करुन ठेवावे व सादरीकरणानंतर Viva-Voce घेऊन मुल्यमापन करावे प्रकल्पाची (Project) Softcopy महाविद्यालयाला/विभागाला पाठवावे व Hard copy विद्यापीठाला सादर करावे.

१०. पदवि/पदव्युत्तर चे प्रात्यक्षिक व पदव्युत्तरचे प्रकल्प (Project) इत्यादी १५ ते २५ सप्टेंबर २०२० दरम्यान पूर्ण करावे.

११. प्रात्यक्षिक परीक्षा तसेच प्रकल्प मुल्यमापन (Project evaluation) आटोपल्यावर लगेच शक्यतो त्याच दिवशी Online पध्दतीने विद्यापीठाकडे गुण सादर करावे.

MCA/MBA/LLM आणि इतर व्यावसाईक पदव्युत्तर अभ्यासक्रम.
(other Professional PG Courses)

१२. MCA/MBA/LLM व इतर व्यावसाईक पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे Project/Dissertation चे मुल्यांकन ऑनलाइन प्लॅटफार्म वर PPT सादरीकरणा द्वारे होईल. अंर्तगत परीक्षक व बाहय परीक्षक Video conferencing द्वारे प्रकल्प (Project) मुल्यमापना करतील. विद्यार्थ्यांना प्रकल्पाचे विषय (content) Online परीक्षा सेंटरला पाठवावे लागेल व Hardcopy परीक्षेनंतर पाच दिवसात महाविद्यालयाला/विभागाला सादर करावे.

विद्यार्थ्यांना विशेष सुचना

१३. विद्यार्थ्यांनी Practical/ Project/ Dissertation साठी Smartphone /Android Phone /Laptop/ Tab/ Computer चा वापर करावा व त्याप्रमाणे परीक्षा केंद्राला/संबंधीत शिक्षकाला कळविण्यांत यावे. आपल्याकडे Android Phone उपलब्ध नसल्यास त्याची व्यवस्था स्वतः करुन घ्यावी व गावातील/शहरातील सुरक्षीत स्थळी जेथे इंन्टरनेट उपलब्ध आहे तेथे हजर रहावे. दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नसल्यास महाविद्यालय/विभागाशी त्वरीत संपर्क साधावे.

उपरोक्त मार्गदर्शक सुचनानुसार प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

10/9/2020

(डॉ. अनिल चिताडे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी :-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर.
२. मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर
४. उपकुलसचिव (परीक्षा पूर्व/उपरांत), परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग, माहिती तथा कार्यवाहीस सादर.
५. संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहिती तथा कार्यवाही सादर.